


REFBK-0012739
REFBK-0012739
९५६२
म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र. ९५६३

૧૯૬૨

2
કાવ્ય

૩૨૯૮૨

૧૫૬૩
૮।૫।૬૨

# श क्ति के तु

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थ
अनुक्रम 32862 वि: काव्य
क्रमांक 96563 नों दि

गं. रा. पाठक

☆

आवृत्ति पहिली

दिनांक २६ जानेवारी १९६२

भारतीय गणराज्यदिन

☆

REFBK-0012739

अमृतम् ज्ञानम् अभयस्य ।

अभय साहित्य : १

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. 92636
ठाणे (स्थल)

मूल्य : एक रुपया

प्रकाशक :
श्री. गं. रा. पाठक
तीन ( जुना ) सदाशिव, पुणें २.

☆

चित्रकार :
श्री. प्रताप सुळीक

☆

सर्व हक्क :
सौ. सुमित्रा गंगाधर पाठक

☆

ठसे आणि मुखपृष्ठ छपाई :
श्री. खाडीलकर

☆

मुद्रक :
श्री. व्यं. रा. शिंगरे
सर्वोदय मुद्रणालय,
४५० बुधवार, पुणें २.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम .................... वि: ....................
क्रमांक .................... नों: दि: ....................

## प्रास्ताविक

'शक्तिकेतु' हें काव्य मी १९४३ च्या फेब्रुवारी महिन्यांत लिहिलें. तें आतां प्रकाशित करीत आहें. त्यावेळीं हें काव्य सुमारें साडेपांचशें ओळींचें होतें. या एकोणीस वर्षांत अधूनमधून स्मरण करण्यापलीकडे मी या काव्याचें कांहींहि करूं शकलों नाहीं. आतां हें प्रकाशित करण्याचा निश्चय केल्यावर त्याची मुद्रणप्रत करतांना त्यांत बरीच भर पडली. आतां या काव्याची संख्या सहाशें चौऱ्याण्णव ओळी आहे.

हें काव्य एकोणीस वर्षें असें पडून रहायला नको होतें. पण दुसरा मार्गहि नव्हता. साहित्यप्रकाशनाचा एक मार्ग मासिकांचा. तो मार्ग यशस्वी झाला असता कीं नाहीं मला शंकाच आहे. सध्यां समाजाचें आणि संपादकांचें काव्याविषयीं प्रतिकूल मत आहे. त्यांतून हें एवढें प्रदीर्घ काव्य. कोणत्याहि मासिकांत एवढें प्रदीर्घ काव्य छापणें व्यावसायिक दृष्टचा अयोग्यच ठरलें असतें. वाचकांनीं कदाचित् अशा संपादकाची चेष्टा सुद्धां केली असती. अशा परिस्थितींत कोणता सुज्ञ संपादक हें काव्य छापण्यास धजला असता बरें ! तेव्हां मी हा मार्ग सोडून दिला.

यानंतर दुसरा मार्ग प्रकाशकाचा. त्या मार्गांत पहिल्यापेक्षांहि अधिक संकटें. मासिकाच्या बाबतींत एकाद्या संपादकानें एकादें प्रदीर्घ काव्य आपल्या मासिकांत छापण्याचा अविचार एकाद्या विशेष प्रसंगीं केला तर त्याचे वाचक निरुपायानें एकाद्या वेळेस तरी तो खपवून घेतील. पण प्रकाशकाचें तसें नाहीं. काव्याचीं पुस्तकें खपायला अति जड असा लौकिक आहे. इतर देशांत कोणतीं पुस्तकें अधिक खपतात असा विचार केला जातो. अर्थात् अगदीं मोजक्या देशांतच. खरें पाहतां जगांत बहुतेक देशांत अजून अंधारच आहे आणि आपण त्यांत अग्रगण्य आहोंत. आपल्याकडे – भारतांत आणि त्यांतहि 'विशेष' विशेषत्वें महाराष्ट्रांत–कमींत कमी खपणारीं पुस्तकें कोणतीं असा विचार 'चालतो.' सारींच पुस्तकें कमी खपतात. त्यांत अग्रपूजेचा मान काव्याचा. तेव्हां प्रकाशकांना काव्यप्रकाशन एक आपत्ति

वाटली तर त्यांत नवल नाहीं. तेव्हां कोणी प्रकाशक हें काव्य प्रकाशित करील असें मला वाटेना.

आजच्या आपल्या समाजजीवनांत साहित्य, साहित्यिक आणि संस्कृति यांना कितपत महत्त्व आहे हें आपणांस सर्वत्र स्पष्ट दिसतें. आपण आतां ही भिकार अवस्था ओलांडून पुढें जाणें इष्ट आणि अवश्य आहे. साहित्याविना समाजाला संस्कृति नाहीं, संस्कृतीविना समाजाचें कल्याण नाहीं, कारण संस्कृति म्हणजे राष्ट्राच्या आचारांची आणि विचारांची सर्वांगीण संपन्नता. जसें साहित्य तशी त्या समाजाची संस्कृति. साहित्य हा समाजजीवनाचा सर्व प्रकारें ' आदर्श ' आहे.

कांहीं ज्येष्ठ व्यक्तींना माझ्याविषयीं आपुलकी वाटते. त्यांच्या बळावर मी हें साहस करूं शकलों. हें खंडकाव्य प्रकाशित स्वरूपांत पाहून मला साहजिकच आनंद वाटतो. हें काव्य माझ्या कांहीं सुहृदांना मीं वाचून दाखविलें. त्यांना तें आवडलें. नंतर **प्रा. डॉ. के. ना. वाटवे** यांच्याकडे जाऊन मी हें काव्य त्यांना वाचून दाखविलें. त्यांनीं मला आनंदानें आपला अभिप्राय दिला. मी त्यांचा एक विद्यार्थी. '**सर्वोदय**'चे आभार मानावे तितके थोडे होतील. श्री. **खाडीलकर** यांनीं अतिशय त्वरेनें मुखपृष्ठ छापून दिलें. त्यांचाहि मी आभारी आहें. चित्रकार **प्रताप मुळीक** यानें सर्व सजावट केली. यानिमित्त मला अभिमान वाटतो.

...माझ्या मराठी रसिकांनीं हा माझा प्रयत्न गोड मानून घ्यावा.

**गं. रा. पाठक**

## प्रा. डॉ. के. ना. वाटवे, एम्. ए., पीएच्. डी.
## यांचा अभिप्राय.

'शक्तिकेतु' हें खंडकाव्य मी प्रथम स्वतः कवीच्या तोंडून ऐकिलें व नंतर वाचलें. ऐकतेवेळीं जो संस्कार मनावर झाला होता तो वाचनानें दृढ झाला. प्रस्तुत खंडकाव्य शोकान्त असल्यानें मनावर खोल ठसा उमटवून जातें. पहिल्या भागांत भीमाच्या शौर्यामुळें त्याच्यावर अनुरक्त होणाऱ्या नागकन्या सुमतीचा मुग्ध शृंगार मनोहर असून त्याला वात्सल्याच्या कडा आहेत. पण या काव्याचा उत्तरार्ध सर्वच दृष्टींनीं अधिक सरस वठला आहे.

यांत भीम व त्याला ज्ञात नसलेला त्याचा पुत्र शक्तिकेतु ( सुमतीचा पुत्र ) यांचा युद्धप्रसंग फार परिणामकारक असून पित्याच्या हातून पुत्राला आलेलें मरण अत्यंत करुण आहे. आपल्या हातून न कळत आपल्या ज्येष्ठ पुत्राचा वध झाला या जाणिवेनें भीमासारख्या वीरानें व्यक्त केलेलें कारुण्य विशेष वेधक आहे. पण मला आवडलें तें कृष्णाच्या तोंडून येणारें भीमाचें सांत्वन. त्या शांतरसात्मक भाषणांत मूर्तिमंत वास्तवता चित्रित केली आहे. त्यांतल्या त्यांत पुढील दोन ओळी फारच समर्पक आहेत '**परमेश्वर जरि इथें जन्मला, असेंच जीवन त्याचें, हृदयद्रावक घडेल अंतीं असेंच मरण तयाचें !** काव्याच्या विषयाला साजेल अशी प्रौढ आणि काव्यपूर्ण भाषाशैली सर्वत्र वापरली आहे. तीमुळें काव्याला उत्तम उठाव आला आहे. काव्यांत योजलेली धांवती जाति रसपरिपोषक आहे.

हें काव्य, मराठी खंडकाव्यांत मानाचें स्थान पटकावील याबद्दल मला तिळमात्र संदेह नाहीं.

**के. ना. वाटवे**

**योगकुंज, चिमणबाग,**
टिळकरस्ता, पुणें २.
२०-१-१९६२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ वि: ........................
क्रमांक ........................ नों: दि: ........................






मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ................ वि: ................
क्रमांक ................ नों दि: ................

# शक्तिकेतु

## पूर्वार्ध

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. 92632
संदर्भ शाखा (स्थळ

### अेक रम्य प्रभात

पातालेश्वर नाग वासुकी...सुमती कन्या त्याची,
पूजा करिते हृदयेशाच्या हृदयास्थित मूर्तींची.
चरणपादुका चौरंगावर सुपूजिता त्या दिसती
सुमती भासे मनोहारिणी पवित्रतेची मूर्ती.
नीलवर्ण ते केस मोकळे रुळती स्कंधावरतीं
सिन्दूराची रेखा मध्यें...अपूर्व शोभा दे ती.
तिलक कपालीं मंगलभूषण कंठामधें विराजे
सौभाग्याचा आणि तपाचा सुंदर संगम साजे
उज्ज्वलता नयनांत, मुखावर हास्य विलसतें शान्त
तेज तपोमय प्रखर...त्यासवें दिसे शीतला प्रीत.

ध्यानरता ती पूजामग्ना...पुष्पें तिच्या करांत...
पाहतसे अन् मूर्ति मनोरम पतिची तदा मनांत.

जीवनदायी स्मृती जयांची सुखांत मजला ठेवी
त्या चरणावर पडो पुष्प हें !...वदुनी मस्तक नमवी.

स्मृती सुखद त्या साऱ्या तेव्हां मनांत तिचिया येती.
वर्षें गेलीं तरी मोहनी नवी जयांची चित्तीं.

पुन्हा पुन्हा ज्या रम्य चिन्तनीं जीवन वाटे स्वप्न
चाळण्यांत तीं चित्रें झालें हृदय तियेचें मग्न.

ज्या नयनांचें दर्शन होतां प्रथम लाजली होती.
अर्धनिमीलित नयन तियेचे परत नयन ते स्मरती.

ना वदता ही कांहीं ज्यांनीं वदुन दाविली प्रीती....
ओठांच्या थरथरुन पाकळ्या शब्द त्यांतुनी स्फुरती
" नाथ !....भाग्य तें कधीं लाभणें पुनरपि या दासीला ..
कधीं दिवस तो पुन्हा उजळुनी करील आशा सफला ?
विराजती मम हृदयीं...कधिं ते चरण पुन्हा वंदीन ?
मनांत बघते तुम्हां, परि कधीं नयनांनीं पाहीन ? "

आणि यापरी चित्त तियेचें चिन्तनांत तें मग्न....
दर्शनास ये पुत्र...तिला ना परंतु त्याचें भान.

पूर्व दिशा करिं घेउन आली पुढतीं बालरवीला ...
नभांत पसरे प्रकाश, आली तेजस्विता धरेला.

शक्तिकेतु ये मातेजवळीं विनम्र जोडुन हात
पुत्रवती ती...तिच्या मंदिरा द्विगुणित शोभा येत.

इतरांचा युवराज, कुणाचा साह्यद बलशाली तो,
परमभक्तिनें प्रभातसमयीं मातृवन्दना येतो.

करांत घेउन पुष्पें होती सुमती पूजामग्न
‘आई....’ वदला पुत्र तिचा तैं नम्र तिला वन्दून.

आणि ऐकुनी बोल तदा ते आली भानावरती
दिव्य सुखाच्या ऊर्मी हृदयीं तिच्या तेधवां भरती.

पुत्रें तिजला प्रभातवंदन परमभक्तिनें केलें
आशीर्वच ना परंतु तेव्हां तिच्या मुखांतुन आले.

कुरवाळुनि ती त्याला...‘ दिससी तसाच अगदीं !’...वदली,
आणि लोचनें जरा तियेचीं स्नेहसुखानें भिजलीं.

वदली त्याला, ‘ आज दिवस तो ! सर्व सांगतें तुजला
पुन्हा पुन्हा जें वृत्त आजवर विचारलें तूं मजला.

निधान मजला कसें लाभलें माझ्या सौभाग्याचें
ऐक वृत्त हें तुझ्या पित्याचें, माझ्या वीरवराचें.

‘ अशीच होती प्रभात खुलली . होतीं प्रफुल्ल कमलें
सर्व दिशा मधुवासित होत्या मलयागिरीच्या अनिलें.

भोगावतिचा प्रवाह होता स्वच्छ जलें भरलेला
कमललतांनीं आणि वेढिलें होतें पूर्ण तयाला.

आकाशासम नीलवर्ण तो होता सागर वरती
रक्तवर्ण त्यांतून छटा अन् प्रवालमणिमय होती.

जललहरींवर तरंगतीं त्या रंगुनिया जलवेली,
धूसर होत्या दिशा ज्यापरी असती त्या पातालीं.

सख्यांसवें अन् तीरावरतीं सुखांत होते रमले
गौरीशाच्या पूजेला मी होतें तेव्हां गेलें.

अचपळ बाला तीरावरती होतों खुडित फुलांना
कुणी गुंफिती माला...देती पुष्पें परस्परांना.

नीलकमल मम करांत होतें हंसरें अन् फुललेलें
आश्चर्यानें नेत्र त्यावरी माझे होते खिळले.

तोंच दूरवर दिसे कांहिसें...भासें मेघापरि तें
नीलवर्ण तें आणि प्रयत्नें तीराजवळीं येतें.

कौतुक मज वाटुनी मनीं ये पाहूं काय असे तें
सावधान अन् पाउल माझें तिकडे तेव्हां वळतें.

सर्व सख्या निश्चिंत, कुणाच्या आलें नच तें ध्यानीं
प्रवाह लक्षुनि हळुच उलट तैं जात पुढें मी जपुनी.

तरुवर होते तीरावरती....लता वेढिती त्यांना
शांतपणें मी पुढें निघालें भेदित त्या कुंजांना.

आणि जरासा प्रवेश होता जेथें रविकिरणांना,
अद्‌भुत सुंदर दिसलें कांहीं विस्मित माझ्या नयना.

विशाल होती शिला तिच्यावर होता तो विश्रमला
विशालदेही युवा टेकुनी विशाल त्या वृक्षाला.

होते कांहीं छिन्न पाश ते त्याच्या देहावरती
चिन्हें नागांच्या दशांचीं तशींच कांहीं दिसतीं.

नीलछटा ती अतीव मोहक आणि श्रमांची ग्लानी
स्तब्धचित्त तो पाहत होता सर्व रक्तनयनांनीं.

पाहत होते त्याला....कांहीं सळसळलीं तों पानें,
आणि पाहिलें मजला त्यानें अपुल्या विशाल नयनें.

उभी स्तब्ध मी ! सुचे न कांहीं मजला काय करावें,
जावें पुढती?...हळूच किंवा मागें पुन्हा वळावें ?

धीरचित्त तो उठला, सारे पाश तोडिले त्यानें
तरुवेष्टित तो लताबन्ध जणुं कोणीं करिराजानें.

सहज तयानें हात ठेविला एका शाखेवरती...
तोंच तुटुनिया पडली खालीं त्याच्या चरणतळीं ती.

हंसुन जरासा पुढें येत तो आणि मजकडे पाही,
क्षणभर आम्हां कुणास कांहीं सुचे न बोलाया ही.

पाहुन नयनीं प्रश्न माझिया पुन्हा जरा तो हंसला
संथ, मधुर अन् गभीर वचनीं उत्तरला तैं मजला.

‘ कळे न कांहीं काय जाहलें....नवलाचि वाटे मजला
भूलोकांतून आलों एथें अज्ञात या स्थळाला.

होतें भंवतीं पाणी सारें...कळे न चित्ता कांहीं,
कुठे, कुठुन, मी कसा निघालों !....पडलों कसा प्रवाहीं !

जलचर...कांहीं सर्प...प्रवाहीं दंश तयांनीं केले,
हात झाडतां पाश तसे अन् कांहीं गळुनी पडले.

अंधारांतुन आलों खालीं...दिसे न कांहीं नयना
क्षणांत कांहीं कळे...परंतु पूर्ण मना उमजेना !

तोंच वाटलें...प्रभात झाली...दिसे तीर हें मजला
दिसलीं हिरवीं वनें...अनिलही शीत वाटला तनुला.

लुप्त दिसतसे दूर...नील हा प्रवाह आकाशांत
धूसर कांहीं छटा जराशा अंधुक त्या दिसतात.

तेथुन येतां वाहत एथें आलों शुद्धीवरती
विचार असती चित्तीं...परि ते मला न कांहीं कळती.

शून्य मनें घेतली असे मी इथें जरा विश्रान्ती
नकळे मजला मार्ग असावा कुठला माझ्यापुढती.

क्षणांत परि मम दैव उजळलें ! .. अनुपम रूपें आली...
दिसे स्पष्ट मम भाग्यदेवता !....चिन्ता मजला नुरली !'

वदला ऐसें !...अतीव मोहक रूप तयाचें दिसलें
तयें तोडिले पाश आपुले....बद्ध मला अन् केलें !

नाहीं वळलें पाउल माझें हळुच पुढें मी झालें
थरथरुनी अन् लाजत त्याला...'स्वागत आर्या !'...वदलें.

देह तयांचा थरके...त्यांनीं स्वतःस परि सांवरलें
'अस्थिरता कां अशी ?...' मुखावर भाव तयांच्या स्फुरले.

वदले मज ते, 'कळे न कांहीं विश्व भासतें चल हें
देह सर्व हा तप्त दाह अन् नयनीं माझ्या आहे.'

वृक्षाजवळीं वृक्ष तसे त्या वृक्षाजवळीं होते
म्लान जरासें समर्थ तरिही त्यांचें रूप दिसे तें.

मनीं माझिया विचार आला, कसला तरी अपाय...
असे जाहला ! अवश्य यांना कांहीं असे उपाय.

कसें न कळलें, परंतु चित्ता साहस कांहीं सुचलें
स्मरण पित्याच्या क्रोधाचें नच मला तेधवां झालें.

लोभ वाटला मोह वाटला सुख चित्तीं उल्लसलें
अन् त्यांच्या चित्रांत भाव मम सहज रंग ते झाले.

'आर्या आहे उपाय !' वदलें, शंकाकुल मम चित्त
परंतु त्यांचें रूप पाहुनी पूर्ण धीर मज येत.

मुखीं तयांच्या मूक प्रश्न ‘ कां अशक्य वाटे कांहीं ?
बाहूंची या शक्ती तुज कां विश्वसनीया नाहीं ? ’

वीरमूर्ति ती पाहुन वदले...‘ दूर धवल तो दिसतो...
स्फटिकाचा सोपान...मार्ग तो हेमगिरीवर जातो.

तिथे असे अन् तातांचा मम भव्य महाप्रासाद
कळस जयाचे मणिमय घेती स्वर्लोकाचा भेद.

भोगावति ही तिथून उतरे खालीं नील प्रवाहें,
भूगंगा अन् धवल तेथुनी पूर्वेंकडती वाहे

कैलासाचा तिथे पायथा, अलकावती पुढें ती
कल्पतरूंचीं तिथे पसरलीं सर्व उपवनें भंवतीं.

सुवर्णकमलें तिथें विकसतीं...कधीं न जेथें रजनी...
अमृतमधु अन् थेंबें थेंबें वाहे त्यांच्यामधुनी.

तो कमलांच्या पत्रांवरूनी वाहे पुढतीं पुढतीं
संथपणें अन् सुधाबिंदु ते सुवर्णकलशीं पडती.

असे कलश तो स्फटिकशिलामय पुष्करिणीच्या आंत.
सदैव जीवर इन्द्रधनूचे रंग खेळ करतात.

अमृत तें जर तुम्हास आर्या प्यावयास लाभेल
पुनरपि काया तुमची कांचनगौर सदा राहील ! ’

ऐकुन हे वच समाधान त्यां...प्रसन्न त्यांचे नयन
करिति सुधावर्षाव मजवरी....पावन मजला करुन.

आणि मला ते वदले....,‘ पूर्वीं असे सुपर्णें केलें...
तेंच करिन मी निश्चित !...आहे यांत कठिण तें कसलें ? ’

त्यांना वदले...‘ आर्या...कर हा घ्यावा आधाराला ’
आस्थेनें अन् दिधलें त्यांनीं माझ्या करीं कराला.

सांवरलें मी त्यांना...नहि ! नहि ! तयींच मज सांवरलें...
वनांतल्या त्या भूमींतुन अन् जपून मजला नेलें.

महाद्वार तें आलें ! होते असंख्य तेथे वीर,
शस्त्रें त्यांचीं बघुन मनाचा ढळला माझ्या धीर.

हंसून परि ते, ‘ जरा धीर धर ’...इतुके वदले मजला....
आणि चकित मी पाहुं लागले त्यांच्या पराक्रमाला.

कितीक आले...सारे गेले....क्षितीच नव्हती त्यांना
प्राण न घेतां केलें त्यांनीं पराभूत सकलांना.

अद्भुत पाहुन शौर्य तयांचें पार पळाले सारे
आणि तयांनीं तदा वळविलें मुख मजकडती हंसरें.

पाहुन त्यांना काय म्हणाले ?...नाहि म्हणाले कांहीं.
हंसुन लाजले अन् नयनां त्या नयन मिळविले नाहीं.

ती पुष्करिणी....कलश तिच्यांतिल तयीं करीं मम दिधला,
हळूच, लाजत, हंसत मुखीं तो त्यांच्या मी लावियला.

सुधाप्राशनें कायापालट क्षणांत त्यांचा झाला
सूर्यापरि मग तेजस्वी तो सुवर्ण लाभे त्यांला.

आणि तयाची प्रभा आरुणी मानसांत मम स्फुरली
क्षणार्धांत मम भावजलीं अन् असंख्य कमलें फुललीं

त्या कमलांचे तेच प्रभू...ती त्यांना वाहुन माला,
मला न कळतां क्षणार्धांत मी झाले त्यांची कमला.

आणि म्हणाले...,‘ नाथ धन्य मी ! घडली अपुली सेवा
खरेंच ! नभिंच्या सुरकन्या ही करतिल माझा हेवा. ’

असेंच कांहीं बोलत होते भाव माझिया मनिंचे,
आणि मजवरी मधुर वर्षलें सुधावचन तों त्यांचें.

‘ देवी ! तूं तर वदलिस सारें ! मला न वचनें उरलीं !
पालटला मम देह सुधेनें...मन या तव करकमलीं.

प्रभात पहिली आज पाहिली...शुभदा अन् रमणीया...
जीवन झालें नवें सुमंगल प्रीतीच्या वचनीं या.’

....

...बोलत होते...कोलाहल तों पुन्हा ऐकला पुढतीं....
विरोधावया यांना सन्मुख कांहीं सेना ये ती !

पार पळाले रक्षक सारे....पित्यास कथिती वृत्त...
‘ अद्भुत दावुन शौर्य कलश कुणि हरुन सुधेचा नेत ! ’

ऐकुन ऐसें वृत्त, पाहुनी त्यांच्या पराभवाला
पातालाचा नाथ...पिता मम, क्रोधावेशें उठला

युद्धासाठीं सिद्ध निघे तो, प्रश्न तयाला पडला
‘ त्रस्त कराया भुजगेशाला झालें धैर्य कुणाला !

कन्या...छाया मम हृदयाची...ती ही कुठे न दिसते !
आपत्ती ही दुसरी कसली माझ्यावरती येते ?

अनन्तास अर्पाया केवळ...कलश काढतो खालीं...
वर्षांतुन मी एकदाच ! अन् काय होत या कालीं ! ’

आणि निनादे गोल तेधवां घोररवानें सारा
क्रुद्ध पिता मम येत धराया कलशहारका वीरा.

थर थर कांपत होते तेव्हां उभी पाठिशीं त्यांच्या
उभे तिथे ते निश्चल होते धैर्यानें सिंहाच्या.

चित्तीं माझ्या वादळ होतें...' काय पुढें होणार !
केलें मी जें साहस.. मज तें कसलें फळ देणार !'

वेगळेंच परि नवल वर्तलें ! क्षणांत विरलें वैर
विषाद सर्वांचाच निमाला, झाला सुखसंचार.

दुरुन पित्यानें त्यांस पाहतां...सर्वांना थांबविलें,
त्यांस जाणतां चित्त तयाचें आनंदानें भरलें.

' प्रियवत्सा '...ते वदले....आले हर्षें जवळ तयांच्या
जवळ येउनी कुरवाळित अन् प्रेमानें पितयाच्या.

जवळीं येतां हळुच पित्याच्या मागें होते झाले,
आणि तयांनीं वळुन तेधवां मजकडती पाहियलें.

' अये !....सर्व हें तुझें कृत्य कां ! मला न कांहीं पुसलें...
वीराला या पाहतांच कां स्मरण पित्याचें नुरलें !'

पित्यास त्यांनीं वंदन केलें सादर विनम्रतेनें
पातालेश्वर तैं त्यांच्यावर वितरत आशीर्वचनें.

विचारलें अन्, ' भूलोकाहुन कां पातालीं आला ?'
स्मरलें होतें त्यांना सारें...उत्तरती प्रश्नाला.

' बांधव अमुचे वैरी...माझा नाश कराया सजले.
अन् क्रीडेच्या मिषें तयांनीं कपटजाल हें रचिलें.

भीरूंनीं विष अन्नामधुनी मला खावया दिधलें ..
मूर्च्छित झालों....सकलां परि मी निद्रित ऐसें गमलें.

बद्ध करुन पाशांनीं त्यांनीं त्याजिलें मज गंगेंत
मोहित आलों अिथे प्रवाहीं तसाच पुढतीं जात.'

तुष्ट पिता मग वदे तयांना...' शासन त्यांस मिळेल...
त्रिलोकांत अन् विशुद्ध तुमची कीर्ति सदा उजळेल.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ............... दि: ...............
क्रमांक ............... नों: दि: ...............



अतिथि मला तूं ..निश्चिन्तेनें घेइ जरा विश्रान्ती
एकच कन्या मज ही...आतां तूंच पुत्र मम पुढतीं.

हीच यापुढें जन्मभरी तव सेवा सदा करील
सुखदु:खाला समान तैशी सहगा तव होईल.'

धन्य जाहलें जीवन मज हें ऐकुन वचन तयांचें
साफल्याची चमक अंतरीं उल्लसुनीया नाचे.

पौरजनांना महोत्सवाची आज्ञा त्यांनीं केली
कोणाच्याही आनंदाला सीमा नाहीं उरली.

द्वितीय पांडव....धनुर्धराचा असे ज्येष्ठ जो भ्राता
भान विसरले सारे तेव्हां स्वागत त्याचें करतां.'

मातेचें वच अैकुन त्याचें थरारलें तैं चित्त...
नाम पित्याचें कळलें...पुरला त्याच्या मनिंचा हेत.

अत्यानंदें वदे–' खरोखर, जगीं धन्य मी माते...
द्वितीय पांडव असे पिता मम ! भाग्य नसे यापरतें !'

वत्सलता हृदयांत दाटली....भिजले नयन तियेचे
मायेचा कर फिरवुन त्यावर सिंचन करी सुधेचें.

भावभरें अन् सहर्ष वदली–' अद्‌भुत अैसें घडलें...
जीवनांत मम...आणि सौख्य तें स्वप्न मनोहर झालें.

पुष्पपांखरापरीं दिवस ते...अनुपम रंग तयांचे...
तसेच चंचल !... कसें न कळलें सरलें वर्ष तयांचें.

जन्म तुझा झाल्यावर गेले परतुन भूलोकीं ते....
आर्यनाग हा विवाह....याचें असेंच बंधन असतें.

त्या वीराचें निधान मज हें...आजवरी या जपलें....
दिवस पाहुनी असा आजचा जगीं धन्य मी झालें

कुरुभूमीवर युद्ध माजलें त्यांचें आप्तजनांसी.
प्रबल पिता ! परि पुत्रापरि जा साह्य कराया त्यांसी.

प्रतिकृती तूं त्यांची ! होते असेच तेव्हां तेही...
पराक्रमाची लीला दावी त्यांच्यापरीच तूंही.

अभिमानें अन् विश्व म्हणूं दे...' धन्य पुत्र सुमतीचा...
पूर्णपणें अनुकार पित्याच्या आहे पराक्रमाचा.'

धराधराची कन्या सुमती सांगत हें पुत्राला
वीरतनय तो...पार नसे अन् त्याच्या उत्साहाला.

' माते, आज्ञा प्रमाण तव ही....असाच मी हा जातों
चरणां स्मरुनी तुझ्या पराक्रम हरिशावापरि करतो.

पूज्य पित्याच्या पवित्र चरणीं विनम्र होइन माते...
आनंदानें बघतिल सारे स्तिमित पितापुत्राते.

द्वितीय पांडव ! वीर आदरें आजवरी मी नमिला...
तयाचाच मी पुत्र ! असे ना सीमा मम भाग्याला !'

मातेपुढती कर जोडुनिया विनम्र सिद्ध उभा तो...
' आशीर्वच दे मातें....मी हा कुरुभूमीवर जातों.

काय वदूं मी सांग तयांना, कसे जाणतिल मातें ?'
उत्तरली त्या सुमती, ' वत्सा, अभिज्ञान तुज देतें.'

आणि उजळले नयन तियेचे अतीव आनंदानें
हेमकरंडक एक आणला उत्साहें अभिमानें.

दंतपत्र अन् अनुपम सुंदर करंडकीं त्या होतें,
नमुन, निरखुनी प्रीतीनें अन् तिनें तयां दिधलें तें.
केतकवर्णापरी धवलिमा....सीमा हैम तयाची
उज्ज्वल पसरे द्युती मनोरम वरती विविध मण्यांची.
कौशल्यानें चित्र रेखिलें त्यावर त्या वीराचें...
भंवतालीं अन् प्रतिमेंतहि त्या वलय दिसे तजाचें.
जलाशयीं प्रतिबिंबे भास्कर तेजोगोल नभीचा....
प्रकाश पसरे प्रतिमेंतुनिया तसाच त्या वीराचा.
पिंगल होते केस, चमकती आयससम ती कान्ती
रक्तलोचनें...दर्पासहही तिथे दयेची दीप्ती.
भालपट्ट तें विशाल...सारें शौर्यसार तें अंग...
तिथे रिपूंना क्रोध दिसे अन् आप्तांना अनुराग.
देउन त्यां ती प्रतिमा, वदली सुमती, 'वत्सा, घे हें—
आले होते....तसेंच त्यांचें चित्र रेखिलें मी हें.
दोन तपें लोटलीं तया...परि सारें नयनांपुढतीं
तुला पाहतां सर्व स्मृती त्या हृदयीं माझ्या येती.
जाशिल तूं...मग तुला पाहतां स्मरतिल सारें तेही
सफलतपा अन् धन्या होइल तेव्हां माता तव ही
पित्यासारखा पुत्र....पृथ्विवर परिमळेल ही कीर्ती
पितापुत्र मज स्मराल तेव्हां मिळेल मज सुखशान्ती
सकलांना तूं प्रिय हो वत्सा...धन्य करी मज जगतीं
गौरव व्हावा तुझा हीच मम असे तपाची पूर्ती.'
सुमती वदली, चित्त तियेचें दंवबिंदूंनीं उमलें,
आणि तिच्या नयनांचीं क्षणभर थरथरलीं तीं कमलें.

निनादलीं तों वाद्यें द्वारीं झाला जयजयकार
पातालेश्वर पिता पातला पुसण्या कुशलाचार.
कळलें सारें वृत्त तयाला...तोही प्रमुदित झाला.
'विश्वस्तुत अन् प्रबलकीर्ति हो....' आशीर्वचनां वदला.
अभिज्ञान तें वन्दुनिया अन् अभिमानें भक्तीनें
जपुन ठेविलें त्यानें निर्भर अपूर्व आनंदानें. २९०
वन्दुन मातामहास, त्याचे आशीर्वच घेउनिया
सज्ज जाहला वीरयुवक तो कुरूभूमीस निघाया.
असंख्य होते वीर तयासह अधीर भूलोकाला...
यावयास !...परि बहुत प्रयत्नें तयें वळविलें सकलां.
होती ईर्षा चित्तीं कांहीं अद्भुत पराक्रमाची
एकलाच तो निघे....शुभेच्छा संगें अन् सकलांची ! २९६

# शक्तिकेतु

## उत्तरार्ध

### अेक भीषण रात्र

कुरुक्षेत्र तें काळोखाच्या कंथेवरी विसावें
त्यावर होती अपुली छाया टाकियली दुर्दैवें
जिथून होता वृक्ष वाढला विजयी कुरुवंशाचा
तिथेच पडले घाव तयावर करण्या नाश तयाचा.
लिहीत होते भारत तेथें भूवर तीक्ष्ण शरांनीं
वीर आपुल्या मरणकथांनीं...रक्ताच्या शब्दांनीं.
भीषण त्या संहारीं गेल्या चालत अठरा रजनी
कला वाढत्या चंद्रकुलाच्या कमी कमी त्या करुनी.
एक रात्र होती त्या भयकर अठरा रात्रीमधली
हळू हळू सांवली तियेची रणभू व्यापुन उरली.

सुयोधनाचें शिबिर दिसतसे लांब सुप्त तें शान्त
मंद दीपिका कांहीं दिसती...वाहे वात निवान्त.

मध्यरात्र ती...काळोखाचा पूर्ण असे अधिकार
युद्धें झालें श्रान्त, स्वस्थ ते निद्रित झाले वीर.

विस्तृत पसरे क्षेत्र...कुणाचा नसे तिथे संचार...
दुरुन शिवा त्या अशिव सुरांनीं माजविती काहूर.

छिन्न गात्र अेकादें नेती वृक अोढुनिया दूर
काळोखांतच श्वान तयावर भुंकत तैं भेसूर.

आकाशांतुन दिवाभीतही सावकाश ते जाती
काळ्या त्या घुमटांत तेधवां रव ते त्यांचे घुमती.

अेक तिथे वटवृक्ष ... तयाचा अमूप तो विस्तार....
पारंब्यांनीं असंख्य ज्याचा असे वाहिला भार.

पक्षिकुलाचें विश्वाचि तें ! ना मुळींच त्याला गणती.
सूर्याचे ना किरण कधीं ही तळीं तयाच्या येती.

वृक्षाच्या त्या तळांतून तैं निघे पुरुष गंभीर
विशाल जणुं त्या तरुचा आत्मा धारण करी शरीर.

दंडपाणि वा स्वयें काळ तो करतो रणसंचार,
क्षेत्रपुरुष वा आला बघण्या कसला झाला भार.

बाहुबली तो वृक्षापासुन आला थोडा पुढतीं
तिथे जरा विश्रमला ठेवुन पाय शिळेच्यावरती.

अन् भंवतालीं अंधारांतुन तयें रोखिले नयन
क्षणभर त्यांची तळप चमकली तमांत त्या लहरून.

रक्तधूसरा ... जरा पीत ही छटा नभीं ती पसरे
तेजहीन अन् विकल दाविलें मुख तें उत्तरचंद्रें.

फिकट तयाची प्रभा घोर त्या काळोखांतच विरली
आणि स्थळा त्या अधिकच भीषण कळा तेधवां आली.
बघतां बघतां त्या वीराच्या चित्तीं विचार आले....
‘ समरांगण हें अशस्त्र होउन शांतपणें विश्रमलें
ध्वजस्तंभ तो समोर दिसतो विजयी पंडुकुलाचा
रक्षणीय तो पांडवास जो दाता असे यशाचा.
अचल दिसे तो मेरुगिरीपरि चढला आकाशांत
चित्तानें ही त्यास स्पर्शण्या जगीं न कोणी शक्त.
विशाल त्याचें पीठ कठिनतर असें शिलांचें केलें.
बाहुबलें अन् ‘ भीमानें ’ त्या असे तिथें उभवीलें.
रक्तफुलांच्या माला प्रतिदिन त्यास वाहिल्या जाती.
सदैव दैवत तुष्ट राखण्या बळी कितितरी देती.
पांडव सारे सदा सज्ज हा स्तंभ राखण्या असतां
जगेल का कुणि यत्न जावया जवळ तयाच्या करतां !
शिखरीं त्याच्या मंद मंद ते चंद्रकिरण ही पडले
जळत दीपिका तिनें तयाचें मूळ प्रकाशित केलें.
दीपिकेवरी मंद वायुच्या लहरी नर्तन करिती
छाया त्याची भूमीवरती फिकट उमटली हलती.
अग्निशिखा ही समंत याचा सारा राक्षित असता
येउन कोण पुढें धैर्यानें होइल यास विजेता ? ’
आणि तयानें पुन्हा पाहिलें ध्वजास विश्वासानें
आणि परतण्या तेथुन अपुलें चित्त वळविलें त्यानें.
तोंच तयाला श्रीकृष्णाचे स्मरले शब्द अमोल
‘ सावध आणिक सिद्ध .... तयाला अन्तीं विजय मिळेल.

अनंत शस्त्रें, अस्त्रें, अवसर अनंत त्यांना मिळती...
जे शत्रूंचा नाश कराया सर्व प्रकारें झटती.

असती कोणी सिद्ध जाहले मंत्रबळाच्या योगें
प्रयत्नपूर्वक प्रसन्न करिती रणदैवत जपयागें
पापवृत्त पाखंडी त्यांना कसलीही न क्षिती ती...
आणि दुष्ट ते सिद्ध स्वतःचा बळी द्यावया होती.
अशा प्रयत्नीं समरदैवता विमोहून ते दुष्ट
प्रतिपक्षाचा अधर्ममार्गांनीं ही करिती घात.'

विजेसारखा विचार चमकुन वीरमनीं त्या गेला,
आणि क्षणभरी विचलित चित्ता राग तयाच्या आला.

'ध्वजस्तंभ, रणदैवत ... जवळीं कुणी न यांच्या दिसतो
कुणी न पांडववीर आज कां रक्षण याचें करितो?

भीषण रजनी असे आजची मंदतेजही चन्द्र
अजून तो ही म्लान असे अन् पसरे हा अन्धार.

आणि अशा समयाला कोणी रिपू दुरंतर आला...
दैवतसाधन करावया ... नच कळेल तें कोणाला!
अुन्मूलनें या स्तंभाच्या मग यश त्याला लाभेल
सर्वनाश अन् दैवतकोपें धर्माचा होओील.

कुटिलमती तो दुर्योधन अन् बांधव सर्व तयाचे.
बालपणीं बंधूला यांनीं दिधले अन्न विषाचें!

असेल त्याला सर्व ज्ञात हें! ... पाठवील तो वीर...
कुणीतरी जो सिद्ध कराया असेल सारें घोर!'

वीरपुरुष तो तदा तमांतुन नीट रोखुनी पाही
गुरगुरले तों श्वान आकृती दूर हालली कांहीं.

कृष्ण अश्व तो ... त्यावर होता वीर कुणी बसलेला
हळू हळू तो पुढें येत ... ना कांहीं भीति तयाला

अंधारामधिं वीर उभा हा निरखत नीट तयाला
दुजा वीर तो रोखुन नयना भेदित काळोखाला.

भूमीवरती प्रकाश थोडा होता अंथरलेला
जळे दीपिका मंद ... ध्वजाचा स्तंभ दिसे तो त्याला.

क्षितिजावरुनी कलतीं किरणें चंद्राचीं तीं येतीं
त्यांत दिसे तें वस्त्र ध्वजाचें हलतें वाऱ्यावरती

अंधारांतिल वीर जाहला त्वेषावेशें तप्त
अनेक तेव्हां चित्तीं त्याच्या प्रवाह उसळुन येत.

‘ कोऽयं मूढः ... कोण मूर्ख हा ? ... कौरवांतही दुष्ट
कीं अंधारीं लपत छपत ये करण्या दैवत भ्रष्ट !

करील पूजन हा स्तंभाचें ! ... उतरलाच कीं खालीं...
हा ! नीचा ! हा खरेंच वळला जाण्या स्तंभाजवळीं ! ’

युवक उतरला खालीं...तेथें पूर्ण शान्तता भरली....
फक्त तयाची छाया त्याला त्यासम अस्थिर दिसली.

आणि हांसला तिला पाहुनी...‘ निर्जन स्थळ हें कसलें !
किती शान्त ही रणभूमी ! किति जीव इथे विश्रमले ! ’

आणि मनीं ये...‘ नीट पहावा ध्वज हा असे कुणाचा...
हाच मार्ग दर्शवील मजला पुढें योग्य शिबिराचा.

या रणभूवर स्तंभ एक हा असे जागता अजुनी !
हा सोपा सोपान !...यमाच्या घरीं जावया चढुनी ! ’

असले कांहीं विचार तेव्हां युवकमनीं त्या आले....
शान्त आणि निश्चिन्त तयाचें पाउल पुढतीं पडलें !
ध्वजपीठाच्या जवळीं आला...तोंच चकित तो झाला...
भीमगर्जनेपरी वचन अन् ऐकूं येत तयाला...

‘ तिष्ठ क्षत्रापसद...कालस्तेऽहं खलु संप्राप्तः
विरामसमये विपरीता तव गतिश्चास्ति संजाता ! ’

‘ क्षात्रियनीचा....थांब...असे रे काळ तुझा हा आला !
मृत्युवेळ तव इथें यावया धीर जिनें तुज दिधला !
अधमतमा...तुज असे दंडितो....तें नच तुला कळेल...
सर्व तुझ्यापरि नीचांना परि स्मरण सदा राहील ! ’

गुहेमधुनिया हरि उसळावा संतापें बाहेर
तसा तमांतुन अकस्मात ये पुढें क्रुद्ध तो वीर.
ध्वजस्तंभ तो मूक उभा अन् रात्र घोर ती झाली...
भयाण शान्ती भंवतीं...दोन्ही वीर उभे ते खालीं.
प्रौढ हरीसम एक...जयानें रिपू मर्दिले सारे,
निर्दाळिल अन् दुसरा वाटे सारे तो निजसारें !
रोखुन बघती परस्परांना...तप्त जाहलें शरिर
दुर्वच ऐकुन वीराचें तें युवक खवळला वीर.
शान्तपणें निराखिलें तयानें सन्मुख त्या वीराला
क्रोधावेशें परंतु सुस्थिर, संथ स्वरानें वदला.
‘ धैर्यवान तूं खरा दाविसी मजला काळपथाला
बलाबलांचा परस्परांच्या विचार तूं नच केला.

अपसद म्हणतां मला....मनीं तव भय कांहीं ना आलें ?
सांग कोण तूं ! काळापुढतीं पाउल हें तव पडलें !'
निर्भय अैकुन वच युवकाचें मनांत वदला वीर—
'दिसे कोवळा पोर !...परि असे हृदयीं याच्या धीर !'
निशाचरांनीं वनीं दडावें अैकुन माझा बोल.
आणि माझिया चरणाघातें हादरेल हा गोल.
गुहेंत कोणी करीं गर्जना पंचानन लीलेनें
प्राणी त्याच्या भयें सर्व ते ओस पाडिती रानें.
तसाच माझा नाद गाजतां, पळे सदा अरिसेना
वाट मला अन् देतां देतां क्षेत्रहि तिला पुरेना.
विचारण्याची नांव मला मम कुणा न झाली शक्ति
भय सर्वांना...जगूं न याची अैकाया प्रत्युक्ति.
आणि पुसे हा नाम मला ! ...तें दिसे यास अज्ञात.
नसे यास कल्पना कोण मी ! ....दिसे न हा भयभीत.
कुणी वीर हा परस्थ दिसतो सुयोधनें पाठविला'
उपहासें हांसुनी वीर त्या युवका तेव्हां वदला.
'ज्ञात तुला नच कोण असे मी ? असोच ते अज्ञात...
कळतां तुज तें...पळतां पळतां पडशिल पडुनी भ्रांत.
रक्षक मी या रणभूमीचा...सदा इथे मी वसतो...
यमास करण्या तृप्त बळी मी नरवीरांचे देतो.
अघोरकर्मा महाबली मी कठोर माझे फांस
करांत माझ्या येतां...सारे सोडत सारी आस.
पिशाचापरी तमा पांघरुन घेअुन अस्त्रें काळीं...
या येथे आलास भूवरी !...गाडिन तुज पाताळीं...

दा. क. 92638

एका माझ्या चरणाघातें !...असली माझी शक्ती
आवरून तरि क्रोध दया मी करतो रे तुजवरती.
आणि सांग जा !..त्या नीचांना...परत लाविलें तुजला...
केवळ त्यांच्या मृत्यूचा मम निरोप त्या कथण्याला.
असे रात्र ही...नसे वेळ ही करण्या क्षत्राचार
आणि तयांच्या वामपथाचें भय न मला तिळमात्र.
आलासी तूं चुकून एथे....दया तुझी ये मजला...
भाग्य मान !–जा ! काळानेंही प्राण परत तुज दिघला.
येउं नको अन कधीं चुकुनही पुढतीं माझ्यापुढतीं
अखंड किंवा मिळेल तुजला माझ्या हस्तें शान्ती !'
युवक हांसला किंचित्....वदला–' योगच दिसे रणाचा...
दोघांचा अभिमान दिसे मज पुरा प्रबल शब्दाचा.
अजाणून वा जाणुन केला माझा तूं अपमान...
प्रथम तुझा आघात...मलाही असेच अन् अभिमान.
मीहि एक तुज अवसर देतो, ' क्षमस्व ' म्हणण्या मजला...
मजपासुन अन् प्राण नंतरीं परत तुझे नेण्याला.
जाण निश्चयें तोंवर पुढतीं काळ उभा तव आहे...
केवळ एका क्षणांत होइल विश्व पारखें तुज हें !'
ऐकुन हें वच, त्या वीराचें जरा सुखावें चित्त–
कां तें न कळे, क्रोध मनीचा कमी जरासा होत.
आणि म्हणाला–' युवका, तुजला जीवदान मी दिधलें
जा तूं अेथुन...रात्रीचे या क्षण थोडेसे उरले !'
अैकुन तें वच त्या वीराचें युवक तया उत्तरला—
' दर्पयुक्त तव वचन सांगतें क्षत्रिय तूं हें मजला.

अपसद मी नच, क्षत्र असे परि, करांत ज्याच्या शक्ती...
अपमानाला सदा देत मी शस्त्रानें प्रत्युक्ती.

धराधारणीं दक्ष, तयांनीं दान दुजांना देणें
मरणें परि ना कधीं कुणाचें दान दयेचें घेणें.

वीर मानिसी स्वतःस तरि तूं शस्त्र करीं घे आतां
'कोण कसा...हें बलसंघातें कळेल बघतां, बघतां!'

कोण युवक हा?' विचार तेव्हां वीर मनीं तो करित
आणि पुसतसे...' सांग कोण तूं...काय तुझें कुलवृत्त!'

हंसुन तया उत्तरें युवक तो, 'कधीं न हें शब्दांनीं
दुजास वदती वीर!...तयांच्या होतें ज्ञात कृतींनीं.

पराक्रमांनीं पुरुष जाणवी अपुल्या श्रेष्ठ कुलाला...
स्वबलानें जी लाभे ख्याती ती भूषण पुरुषाला.

आणि तुला जर कळलें माझ्या पितृकुलाचें वृत्त...
गलितधैर्य–तें ऐकुन–पळशिल एकाच तूं क्षणांत.

अपमानाचें शासन करणें शक्य न मज होईल...
कुलाश्रयाचा कलंक मजला अपकीर्ती आणील."

ऐकुन हें वच, त्या वीराला क्रोध नावरे चित्तीं...
मत्तगजासम शक्त...गदा तो घेउन आला पुढतीं.

युवकानें ही तदा आपली गदा घेतली हातीं
परस्परांचीं शस्त्रें मग तीं परस्परीं आदळतीं

कुणी न जवळीं युद्ध पहाया लढती ते निकरानें
आघाताला प्रत्याघातें उत्तरती वेगानें.

प्रौढानें त्या गदा हाणिली लक्षुन छाती त्याची...
तयें अडविली बळें, तुटुन परि पडली गदा तयाची.

धैर्यशील तो खड्ग करीं घे आणि परतवी घाय
सोसुन तो मग प्रौढ क्षणभरी मागें घेई पाय.

पाहुन ती उद्दाम धीरता मनीं खवळला वीर...
पुढें परतुनी येत...गदा अन् फिरवितसे चौफेर.

परी न मागें जात युवक तो–अडवी त्या लीलेनें....
गदेवरी खणखणाट होई त्याच्या त्या खड्गानें.

आदळलें मग तीक्ष्ण तयाचें खड्ग गदेच्यावरती
वीरकरांतुन तुटुन गदा ती पडली भूमीवरती.

त्यानें ही मग खड्ग टाकिलें, भिडती बाहुबलानें..
परस्परांना बलशाली ते गर्जत विकटरवानें.

आटोपे ना कुणी कुणाला...समबल दोन्ही वीर
चन्द्र येत तो वरतीं...झाला कमी जरा अंधार.

महावृक्ष तो तिकडे, इकडे ध्वजस्तंभ अन् होता
त्वेषानें झुंजती वीर ते मध्यें विजयाकरितां.

आवरे न तो युवक...पाहतां वीर चकित मनिं झाला,
'आजवरी ना कुणीं साहिलें इतुकें मम शक्तीला!

...सहज लाभली दिसे यास कीं घटोत्कचासम शक्ती
आणि चपलता खरी दिसतसे कुमार मन्यूपरि ती!

कोण तरी हा कुमार!...' त्याच्या विचार येती चित्तीं,
क्षणैक आली आणि शिथिलता त्याच्या करास तैं ती.

शिरीं तयाच्या आदळला तों युवकाचा आघात
तीव्र वेदना भरल्या साऱ्या त्याच्या तैं शरिरांत.

साहुन त्या उद्दाम जाहला...सर्व विसरला पार
क्रोधानें आघात करितसे युवकावर त्या घोर.

12630

तोहि करी प्रतिकार बलाची सीमा अपुल्या करुनी
साहुन सारें, प्रत्युत्तर अन् करीच आघातांनीं.
ज्या शक्तीनें हिडिंब गेला सत्वर यमसदनाला...
वज्रकरें ज्या पार चूर्णिलें त्यानें किर्मीराला...
ज्या त्वेषानें वक्ष बकाचें केलें भग्न तयानें....
तयेंच हृदयीं प्रहार केला युवकाच्या क्रोधानें.
त्या आघातें मूर्च्छा आली...आवरली न तयाला....
मर्माघातें अस्थिर होउन भूवर तो कोसळला.
पडताना तो वीरानें त्या त्वरित तयाला धरिलें
क्षणांत विसरुन वैर आपल्या अंकावर सांवरिलें.
मुखावरुन त्या हात फिरविला व्याकुळ वत्सलतेनें
अन् युवकाच्या वक्षावरचें कवच फाडिलें त्यानें.
त्या कवचाच्या पत्रानें मग घालित वारा त्याला...
शुद्धीवरती युवक तदा तो त्या यत्नांनीं आला.
गेले त्याचे नयन खोल अन् कोरड कंठा पडते
विकल जाहलें शरीर, व्याकुल प्राण तसे होती ते.
आणि पाहिलें, अंकावरतीं असे घेतलें त्यानें...
आनंदानें तयें आणिलें हांसू मुखीं प्रयत्नें.
‘ श्रेष्ठ वीर तू !... उचित मरण मज युद्धामध्यें दिलेस...
पित्यावरी अन् अन्तिमसमयीं हृदयाशीं धरिलेस !
उदयिक परि ना राही येथे, कुठे तरी जा दूर...
त्रिलोकांत विख्यात पिता मम असे भयंकर वीर !
प्रतिज्ञा न कधिं मिथ्या त्याची, क्रोध असे अनिवार.
रिपुसंहारीं स्वयं यमाला देत सदा तो हार.

कुणी न रक्षिल तुला, करांतुन त्याच्या तयास कळतां...
प्राण हरिल तो तुझे आपुल्या प्रियपुत्राच्या करितां. '
गहिवरलेला वीर वदे त्या गद्‌गदलेल्या वचनें
धीर, शान्त, परि म्लान मुखीं त्या खिळलीं त्याचीं नयनें.

' सांग–कोण तो भाग्यवान–कीं जयास तुजसम पुत्र !
वंदनीय अन् श्रेष्ठ असा तो त्रिलोकनिर्जित वीर ! '
वीर तयाला वदे ..मनांतुन होता आकुल झाला...
कवटाळुनिया धरलें होतें त्यानें त्या युवकाला.

प्रश्न तयाचा ऐकुन, हांसुन युवक तया उत्तरला
नेत्र चमकले अभिमानें अन् आलें तेज मुखाला.
जों शौर्याचा सागर, आहे दीनजनांचा त्राता...
' द्वितीय पांडव ! ... धनुर्धराचा असे ज्येष्ठ जो भ्राता ! '
ऐकतांच तें चित्त चरकलें...प्रश्न तयाला पडला...
मनांत थरकत हळूंच तेव्हां युवकाला तो वदला.

' द्वितीय पांडव...वत्सा वदसी जाणसी न का मजसी ?
तयेंच आहे सांवरलेलें अंकीं त्याच्या तुजसी ! '
ऐकुन तें वच आनंदानें युवक प्रफुल्लित झाला
दावुनिया अश्वास, प्रयत्नें...' हेमकरंडक '...वदला.

मुका पशू तो होता जवळीं खिंकाळत दुःखानें...
तीव्र वेदना होती...ताडी भूमीभाग खुरानें.
हळूच उठुनी तयें पाहतां घोड्यावर त्या दिसला...
पाथेयामधिं नीट ठेविला हेमकरंडक त्याला.
धीर धरुनिया आंत पाहिलें...थरके सर्व शरीर
प्रकाशतो वरि चंद्र त्यांत त्या स्पष्ट दिसे तें चित्र.

मनांत मग त्या येती त्याच्या सळकन् साऱ्या लहरी.
नेत्रापुढतीं तशी दिसे अन् कथा स्पष्ट त्या सारी.
शांतपणानें स्तंभ जलाचा परत प्रवाहीं यावा...
लोट धुळीचा आकाशांतुन भूमीवरी विरावा,
विद्ध खगेन्द्रें पंख पसरुनी हळूच खालीं यावें,
भोंवळलेली मान लांबवुन भूमीवरी पडावें.
तसेंच झालें त्याला ! त्याचें विद्ध जाहले नयन...
कंपित सारा देह तयाचा खालीं ये थरकून !
चित्तीं स्मरलें चित्र मनोरम रमणी दिसली त्याला.
जिनें तयाच्या चरणीं होतें दिधलें सर्वस्वाला.
दारीं होती उभी ..तियेच्या करांत होता बाल...
दों महिन्यांचा...चार नेत्र अन् भिजवित त्याचे गाल.
चित्त आवरुन तयें, तयाचे केस सारले मागें.
अश्रूंच्या त्या उष्णसिंचनें बालक झालें जागें.
नयन निरागस इवलसे ते....रेषा ती ओंठांची
चुळबुळ त्यांची करी मिळवणी सहस्र मधुबोलांची !
आणि तयानें त्या बाळाचें चुंबियलें तें भाळ !
स्पर्श मुखीं त्या मृदुल फुलाचा अमर जिंकुनी काळ.
तोच स्पर्श हा !....वत्सलता ती....तीच जाहली जागी
तीच मनोरम रमणी वाटे उभीच आहे पुढतीं !
भाळावरतीं पुत्राच्या अन् ओंठ ठेविलें त्यानें
'सुमती !...केलें वचन पूर्ण तूं ..' वदला तो दुःखानें.
शक्तिकेतु तो विकल तयाच्या मांडीवरती होता...
आणि तयाचा स्पर्श पित्याला शीतल वाटे आतां.

कळलें त्याचें कृत्य तयाला....घाव जाहले ह्रदयीं
तीव्र वेदना आक्रोशुनिया मुखांत त्याच्या येई.

ह्रदयीं धरुनी घट्ट मुलाला, ‘ हतोऽस्मि वत्स ’ वदे तो....
दुःखभरानें भारावें स्वर !...सर अश्रूंचा येतो.

शक्तिकेतुनें आर्त ऐकुनी हांक उघडिले नयन...
म्हणे ‘ तात ! ’ अन् हात उचलले तयें कराया नमन.

शक्य न झालें परी त्यास तें स्तब्ध जाहलें शरिर
सोडुनिया देहास तयाचा प्राण निघाला दूर !

कलेवराला कवटाळुन त्या भीम करी शोकाला,
हन्त ! हन्त ! या पाप्यानें मी वधिलें कीं पुत्राला !

शक्तिकेतुचा अश्व...तयानें खूर झाडिले चारी
खिंकाळुनिया गाजविली अन् रणभूमी ती सारी.

आणि शेवटीं पडून खालीं तोही शान्तचि झाला...
स्वामिभक्त तो.... सेवा करण्या त्याची निघून गेला.

किलबिल करिती घिरट्या घालुन पक्षी भंवतीं भंवतीं
पुन्हा आपुल्या घरट्यामध्यें जाउनिया विश्रमती.

दुरून रडती श्वान...तयांची अमंगल ती हेला...
भीमभयानें मधेंच थांबत दावी भेसुर लीला.

चंद्र प्रकाशे स्वच्छ....चहुंकडे स्पष्ट दिसे अन् नयना...
महावृक्ष तो मागें...पुढतीं बघतां क्षेत्र सरेना.

अंकावरतीं पुत्र, तयाला आळवितो तो आर्त
पितृभक्त तो पुत्र...पित्याला उत्तर परि ना देत.

तीं शस्त्रें...तें कवच छिन्न....तो मुकुट धुळीस मिळाला
तें अश्वाचें प्रेत....क्रमानें सर्व दिसे हें त्याला.

चित्रयुक्त तें दन्तपत्र...अन् हेमकरंडक त्याचा
पुन्हा पुन्हा हीं सर्व तयाच्या ठाव घेत हृदयाचा.

आणि जयाचा देह लोहमय...अजेय तो शस्त्रांनीं
शतक्षतांनीं व्याकुळ केला निर्जिव त्या अस्त्रांनीं.

आवेशानें भीम उठे मग अतीव दु:खावेगें
शक्तिकेतुचें खड्ग तयें अन् करीं घेतलें रागें.

मानेवर आघात कराया मागें नेला हात
तोंच मागच्या मागें धरिला कोणीं तरी करांत.

भीमाच्या संतापतप्त अन् शोकमूढ देहाला,
दिव्यकराचा स्पर्श सकल संतापनिवारक झाला.

मृदुल कमलपाकळ्या कराच्या अश्या स्नेहल होत्या
चित्ततनूच्या सकल वेदना निवटिति संजीवक त्या

असें कमल तें अतुल बलानें होतें सकल बलांना
वैर असो वा स्नेह...सर्वदा अलंघ्य तें सकलांना.

तत्क्षणींच तो स्पर्श जाणला देहानें, हृदयानें...
खड्ग करींचें, दु:ख मनींचें मुक्त सोडिलें त्यानें.

दु:खाचा आवेग लोटला कंपित करुनी त्याला.
हृदयविदारक, व्याकुल वचनीं भीम तेधवां वदला.

‘ प्रभो ! तुला या भीमाची कां तिळहि दया नच आली ?
हाय ! काय हें तुवां घडविलें ! कसली शिक्षा दिधली !

इतुकें माझ्या हातीं घडलें...आत्मघात मी केला...
आणि दयाळा इथेंच कां तूं होतासी लपलेला ?

कुठें सुदर्शन तुझें ? कां न तूं केला व्यत्यय कांहीं ?
या भीमावर कुणींच कां रे मरण टाकलें नाहीं ?

घटोत्कचाचा अन् मन्यूचा ज्येष्ठ बन्धु हा होता....
आणि प्रभो...या भीमाचा हा पहिला बालक होता.'

ज्या भीमाच्या भयें काळही स्वस्थ थांबला असता...
तो बावरला...दीन जाहला...प्रिय पुत्राच्याकरितां.
वीर उभे टकमका पाहती...कुणा न उरलें भान...
व्यथित मनानें सर्व आपुले पुसती भिजले नयन.
परंतु जवळीं निधान होतें योगीश्वर कृष्णाचें
भीमानें अन् आवेगानें धरिले चरण तयाचे.
गभीरतेजा, चतुर्भुजा अन् होती श्यामल मूर्ती
करितो पंकजलोचन प्रभु मग दुःखाची निर्वृत्ती.
सकल ऐकती शांत आणि गंभीर तयाचीं वचनें.
काळ थांबला लिहावया तीं अपुल्या गुप्त करानें.

'असाच होता योग ! ...अक्षरें अशींच लिहिलीं होतीं...
या रणभूवर...दैवगतीनें अलंघ्य अन् सकलां तीं.
सर्वांच्या जीवनांत चाले चार पाउलें पुढतीं...
नियती...! तिचिया अनुरोधें अन् सकल पाउलें पडतीं.
सत्र असे हें अखिल विश्व अन् पडत आहुती यांत
दिनरात्रींच्या...अविरत अन् हा क्रम राहील अनंत.
या क्षेत्रीं तर असेच कांहीं भीषण होतिल घात,
अितिहासाला साक्ष द्यावया स्मृति उरतील ज्वलंत.
या भूमीचें दैवचि हें कीं...आप्तांचा आप्तांनीं.
घात करावा आणि रडावें नंतर त्यांना स्मरुनी... !

परमेश्वर जरि इथें जन्मला, असेंच जीवन त्याचें...
हृदयविदारक घडेल अंतीं असेंच मरण तयाचें.

युगायुगांच्या इतिहासें हें भविष्य आहे लिहिलें...
कालचक्र हें असेंच एथें गति घेउनी निघालें.

अजाणून वा जाणुन भू ही बन्धुजनांच्या रक्तें
सदैव रंजित होइल ! मज हें दूर...दूरचें दिसतें !
या युद्धाच्या आरंभीं मी वदलों जें पार्थाला...
तेंच तुलाही वदतो...आवर तुझिया उद्वेगाला !

कर्मयोग हा ! कर्मफलाचि हें !...आतां प्राक्तन झालें...
आरंभानें सदैव निश्चित अंतस्वरूप केलें.

या भूमीच्या इतिहासाला कधींच आहे झाला...
आरंभ ! नि तो...इथेच दे मी विराम मम वचनाला.

जाणतसे मी पुष्कळ !...पुष्कळ !...माझें दुःख अनन्त...!
शान्त...शान्त हो भीमा !...हा तुज अल्प असे आघात !'

श्रीकृष्णाच्या वचनीं झाला दाह जरासा शान्त
दीनपणानें शरण जाउनी तयें जोडिलें हात.

शिरसा केली प्रमाण आज्ञा, भीमें धरिला धीर.
पुत्र ठेविला अग्नीवरतीं...शिंपत नयनीं नीर.

दन्तपत्र तें...हवन तयाचें केलें त्याच चितेंत
रिता करण्डक परन्तु त्यानें धरिला तो हृदयांत.

आणि म्हणाला ...' देवी, ज्यापरि भीम असे तव चित्तीं
करंडकीं या तशीच माझी प्रतिमा शोभत होती.

प्रतारणा मी केली...प्रतिमा भस्म होउं दे आतां
भग्न हृदय तव, तसाच पुढतीं रिता करंडक आतां.
कधीं तरी हें चित्त तुझें मी आणुन देइन तुजला
घे हें तेव्हां ! कठोर शिक्षा करून या पाप्याला !

हें न मनोगत त्याचें तेव्हां कोणालाही कळलें.
दन्तपत्र तें दिव्यकथेसह एका जळुनी गेलें.
सर्वांच्या नयनांत आसवें दुःखभरानें भरतीं
कोमल शब्दें भीमाचें अन् सान्त्वन सारे करिती.

पुत्राला त्या सर्व पित्यांनीं, बन्धूला बन्धूंनीं
भगवन्तें भक्ताला, आणिक वीराला वीरांनीं
निरोप दिधला मंत्रांनीं अन् अश्रूंनीं पूजियलें...
स्मृतिरुपानें चित्तीं रक्षुन सर्व परत ते फिरले.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम .............. वि: ...... ..........
क्रमांक ........................ नों: दि: ............

# समारोप

शक्तिकेतु हें खंडकाव्य पिता आणि पुत्र यांचें योगायोगानें झालेलें युद्ध आणि त्यांत पुत्राचा पित्याच्या हातून वध या मध्यवर्ति कल्पनेवर आधारलेलें आहे. पिता आणि पुत्र यांच्यांतील युद्धप्रसंगाचीं उदाहरणें आपल्या प्राचीन साहित्यांत पुष्कळ आहेत. भास या कवीनें आपल्या 'मध्यमव्यायोग' या एकांकिकेंत भीम आणि घटोत्कच यांच्या विरोधाचें वर्णन केलें आहे. मारुति आणि मकरध्वज यांचें युद्ध चमत्कृतिपूर्ण आहे. श्रीराम आणि त्याचे वनवासी पुत्र कुशलव यांच्या युद्धाचा कथाभाग लोकविख्यात आहे. अर्जुन हा इंद्राचा अंश. खांडववन दहनाच्या प्रसंगीं इंद्र आणि अर्जुन यांचें युद्ध झालें. हें सुद्धां पितापुत्रांचेंच युद्ध. अर्जुनाला बभ्रुवाहन नांवाचा पुत्र होता. धर्मानें अश्वमेधासाठीं घोडा सोडला असतां अर्जुन आणि बभ्रुवाहन यांचें घनघोर युद्ध झालें आणि त्यांत अर्जुनाचा वध झाला. त्यानंतर आपल्या मातेचें दुःख पाहून बभ्रुवाहनानें पाताळांतून संजीवक मणी आणला आणि अर्जुनाला जिवंत केलें. आपल्या प्राचीन साहित्यांतलीं पितापुत्रयुद्धाचीं हीं कांहीं उदाहरणें बहुतेकांना माहीत आहेत.

यानंतर आपल्या महाराष्ट्राच्या इतिहासाचा विचार केला तर पितापुत्रविरोधाचीं अशींच कांहीं उदाहरणें आपल्याला आढळतात. राष्ट्रविधाता

शिवाजी आणि त्याचा महापराक्रमी परंतु संतापी पुत्र युवराज संभाजी या पितापुत्रांचा विरोध अभ्यसनीय आहे. त्यानंतर व्यापक दृष्टीचा पुरुषार्थी पहिला बाजीराव आणि त्याचा पुत्र बाळाजी तथा पेशवा नानासाहेब यांचा मस्तानीप्रकरणांतील विरोध अस्पष्ट परंतु साक्षेपानें लक्षांत घेण्यासारखा आहे. समतावादी संत एकनाथ आणि त्याचा पुराणमतवादी पुत्र हरिपंडित यांचा तात्त्विक विरोध महत्त्वाचा आहे. आरंभींच्या परिच्छेदांतील उदाहरणें प्राचीन आणि पौराणिक आहेत. त्यांत कल्पनाचमत्कारांचें इंद्रधनुष्य आहे. परंतु ऐतिहासिक काळांतील या पितापुत्रांच्या विरोधांतून आपल्या राष्ट्रीय स्वभावावर आणि संस्कृतीवर चांगला प्रकाश पडतो. या संघर्षाचा आधार घेऊन चांगल्या प्रकारची गद्य अगर पद्य रचना करतां येईल.

शक्तिकेतु या खंडकाव्यांत भीम आणि त्याचा पुत्र यांच्या युद्धाचा कथाभाग आहे. भीम हा शरीरसामर्थ्यानें प्रचंड होता. कौरव आणि पांडव यांचें लहानपणापासूनच पटत नव्हतें. दुर्योधनाला पांडवांविषयीं आणि त्यांतूनहि भीमाविषयीं अतिशय द्वेष वाटत असे. भीमाचा घात करण्यासाठीं दुर्योधनानें एक कट रचला. त्यानें गंगेच्या तीरावर कांहीं दिवस आनंदांत घालविण्याची योजना आंखली. शिबिर वसवलें गेलें. कौरव आणि पांडव तेथें जाऊन राहिले. दुर्योधनानें भीमाला कालकूट विष मिसळलेलें अन्न खूप आग्रहानें खायला घातलें. नंतर तो मूर्च्छित झाल्यावर त्याला लतापाशांनीं बांधून गंगेच्या प्रवाहांत टाकून दिलें. पाण्यांतील सर्पांच्या दंशाचा भीमावर औषधाप्रमाणें परिणाम झाला आणि त्याचें विष उतरलें. नंतर भीम पाताळांत गेला. तेथें वासुकीनें त्याला अमृताचीं कुंडें पिण्यास सांगितलें. भीम आठ अमृतकुंडें प्याला. आठ दिवसांनीं पाताळांतील नागांनीं त्याला तो गंगेंत पडला होता त्या ठिकाणीं आणून सोडलें. तेथून तो हस्तिनापुराला आला. अशी कथा महाभारतांत आदिपर्वांत आहे.

माझ्या अगदीं लहानपणीं मी एका कीर्तनांतील आख्यानांत ही कथा पुष्कळ सजवलेल्या आणि वेगळ्या स्वरूपांत ऐकली. भीम पाताळांत गेला तेव्हां वासुकीनें त्याला आपली कन्या दिली. तिला एक पुत्र झाला. त्याचें नांव बभ्रु. पुत्राचा जन्म होईपर्यंत एक वर्ष भीम पाताळांत होता. नंतर तो

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.

अनुक्रम ........ मि: ...समारोप....
क्रमांक ........................ नों दि ..............

परत हस्तिनापुरास आला. पुढें कुरुक्षेत्रावर कौरव आणि पांडव यांच्या युद्धाचा प्रसंग जवळ आला. त्यावेळेला हा भीमपुत्र बभ्रु कौरवांच्या पक्षाला मिळाला. पांडवांच्या बाजूला जाऊन दुर्बल कौरवांशीं युद्ध करण्यांत विशेष पुरुषार्थ नाहीं असें तो म्हणत होता...त्याच्याजवळ अत्यंत भयानक आणि विषारी तीन धूमास्त्रें होतीं. भीम, अर्जुन आणि स्वतः श्रीकृष्ण यांच्याविरुद्ध त्या तीन अस्त्रांचा तो उपयोग करणार होता. श्रीकृष्णाला हें सर्व माहीत होतें. या तीन अस्त्रांचीं तीन कांडें म्हणजे नळ्या होत्या. म्हणून सर्व या बभ्रूला 'त्रिकांड बभ्रु' असें म्हणत असत. असा हा अद्भुत भीमपुत्र पांडवांच्या विरुद्ध आपल्या पक्षांत मिळाला म्हणून दुर्योधनाला अतिशय हर्ष झाला.

यानंतर युद्धाला आरंभ होण्याच्या आदल्या रात्रीं रणभूमीची पूजा करायची होती. ही पूजा ज्या त्या पक्षांतील सर्वांत प्रबल वीरानें करायची असा प्रघात होता. अर्थात् दुर्योधनानें आपल्या पक्षांतील सर्वांत प्रबल वीराला म्हणजे या त्रिकांड बभ्रूला रणभूमि, रणस्तंभ आणि रणदैवत यांची पूजा करण्यास पाठविलें. ही पूजा त्या वीरानें एकट्यानें गुप्तपणें जाऊन करायची असे. त्याप्रमाणें हा वीर मध्यरात्रीं रणभूमीवर गेला. इकडे श्रीकृष्णानें भीमाला आज्ञा केली कीं, तूं एकटा गुप्तपणें रणभूमीवर जा आणि तुला तेथें जो कोणी अशी पूजा करीत बसलेला आढळेल त्याच्या मस्तकावर, कसल्याहि प्रकारें अनमान न करतां तुझ्या गदेचा प्रहार कर. तो जिवंत राहतां कामा नयें.

श्रीकृष्णाच्या सांगण्याप्रमाणें भीम रात्रीं रणभूमीवर गेला आणि त्यानें रणभूमीची पूजा करीत असलेल्या त्रिकांडबभ्रूच्या पाठीशीं जाऊन मागूनच त्याच्या मस्तकांत गदा घातली. त्या प्रहारानें त्रिकांड बभ्रु मरणोन्मुख होऊन पडला. पण त्यानें भीमाला ओळखलें आणि त्याची अतिशय निर्भर्त्सना केली. भीमालाहि हें सर्व कसेंसेंच वाटलें. एवढ्यांत श्रीकृष्ण तेथें आला. तेव्हां संतापलेल्या भीमानें, 'तूं माझ्या हातून पुत्रघाताचें नीच पाप कां करविलेंस?' असा प्रश्न त्याला विचारला. श्रीकृष्णानें त्याला उत्तर दिलें, 'हा तुझा पुत्र असला तरी कौरवांच्या पक्षाला मिळाल्यामुळें पांडवांचा वैरीच होता. त्यांतूनहि

हा विचित्र पराक्रमी ' त्रिकांड बभ्रु ' होता. याच्याशीं रणभूमीवर आपलें युद्ध झालें असतें तर हा तुला आणि अर्जुनालाहि आवरला नसता. अखेर मलाच याच्याशीं युद्ध करावें लागतें आणि कौरवपांडव युद्ध बाजूलाच पडलें असते. मला सुद्धां याचा पराभव केव्हां आणि कसा करतां आला असता हा प्रश्नच आहे. तेव्हां हें भविष्य ओळखून मी हें सर्व योग्यच घडवून आणलें. '

श्रीकृष्णानें भीमाला असें उत्तर दिलें. त्रिकांड बभ्रूची कथा ही अशी आहे. ' कथा कल्पतरु ' या पौराणिक कथासंग्रहांत ही कथा आहे. आठव्या स्तबकांतील चोविसाव्या अध्यायांत भीमानें विषयुक्त अन्न खाणें आणि पातालांत जाणें इत्यादि कथाभाग असून पुढें दहाव्या स्तबकांतील तिसऱ्या अध्यायांत बभ्रूची कथा आलेली आहे. ती जरा वेगळी आहे. पुष्कळ वर्षें या कथेची अगदीं पुसट स्मृति माझ्या मनांत होती. भीमाच्या विषान्नग्रहणाची कथा मी अगदीं लहानपणीं प्रथम पांडवप्रतापांत वाचली. त्याचप्रमाणें कथा-कल्पतरूचे खंडहि मी तेव्हांच वाचले. मात्र माझ्या मनावर या कथानकाची न पुसणारी स्मृति उमटली ती त्या एका कीर्तनकाराच्या कथेंतील आख्यानाची. तें अतिशय मनोरम साधलें होतें.

नंतर माध्यमिक शाळेंत शिकत असतांना शेवटच्या वर्षी मॅथ्यू ॲर्नाल्डच्या ' सोहराब आणि रुस्तुम ' या काव्याशीं माझा परिचय झाला. टेनिसनचें ' एनॉक् अर्डेन ' आणि हें ' सोहराब अँड रुस्तुम ' हीं काव्यें त्यावेळेला पुष्कळ शाळांच्या अभ्यासक्रमांत असत. याप्रकारें ' शक्तिकेतु ' काव्याचें कथासूत्र माझ्या मनांत जमत गेलें.

प्रस्तुत काव्याच्या कथारचनेंत मी मुख्य बदल केला तो श्रीकृष्णाच्या व्यक्तिवैशिष्टयाचा. मीं वर उद्धृत केलेली भीमाची आणि बभ्रूची कथा, आणि शक्तिकेतूची कथा या दोघांची तुलना केल्यावर मी केलेले इतरहि आणखी कथानकांतील बदल लक्षांत येतीलच. शक्तिकेतु आणि बभ्रु यांच्या स्वभावचित्रांत मी पूर्ण बदल केला आहे. काव्यांतील प्रसंग, त्यांची सजावट इत्यादि गोष्टींचा विचार वाचकांनीं करावयाचा आहे.

काव्याच्या पूर्वार्धाची घटना पाताळांतील आहे. त्या अनुरोधानें त्या स्थळाचें चित्र रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे. स्वतः सुमति आपल्या पुत्राला

आपल्या ‘ वीर वराचें ’ वृत्त सांगत आहे. ही एक रम्य प्रभात आहे. भीम आणि सुमति यांची दृष्टिभेट, भीमाची विकल अवस्था, त्यावर सुमतीला सुचलेला उपाय, अमृतकलशाची पुष्करिणी असलेलें उपवन, भीमाचा पराक्रम, त्याचें अमृतपान, भीम वासुकीभेट, त्यांचें संभाषण, भीम सुमति विवाह, शक्तिकेतूचा जन्म, भीमाचें हस्तिनापुराला जाणें, कुरुयुद्धाचा उल्लेख आणि सुमतीनें आपल्या पुत्राला भीमाच्या साह्यार्थ पाठविणें अशी प्रसंग-मालिका पूर्वार्धांत आहे. यांतील बराच भाग सुमतीनें स्मरण सांखळीच्या स्वरूपांत सांगितला आहे. सुमतीच्या स्वभावाचें आणि व्यक्तित्वाचें सुवर्ण त्यांतून प्रकट होतें कीं नाहीं हें वाचकांनीं पहावें. त्याचप्रमाणें सुमतीनें आपल्या पुत्राला दिलेल्या अभिज्ञानाची कल्पना कितपत यशस्वी झाली आहे हें पहावें. दन्तपत्र म्हणजे हस्तिदन्ताचें पातळ पान.

काव्याचा उत्तरार्ध आहे ‘ एक भीषण रात्र. ’ शक्तिकेतु कुरुक्षेत्रावर नेमका रात्रीं येऊन पोहोंचला हा योगायोग–कुरुक्षेत्राच्या वर्णनाकडे लक्ष द्यावें. त्याचप्रमाणें तो विशालवृक्ष. शेवटीं सौप्तिक पर्वांत अश्वत्थाम्यानें एक घटना पाहिली. एका विशाल वृक्षाखाली पराभूत आणि उदास मनःस्थितींत तो पडलेला होता. त्यावेळेला एका घुबडानें त्या वृक्षावर शांतपणें झोंपलेल्या कावळ्यांना क्रूरपणानें मारून टाकलें. तोच हा वृक्ष. त्याचप्रमाणें रणदैवताची कल्पना. अश्वत्थाम्यानें या घटनेवरून बोध घेतला. अर्जुनानें पांडवांच्या शिबिराच्या द्वाराशीं उग्रभैरव दैवताची स्थापना केली होती आणि शिबिरांत श्रीकृष्ण आणि पांडव याव्यतिरिक्त सर्व पांडवसैन्य शांतपणें झोपलेलें होतें. अश्वत्थाम्याचा पराक्रम त्या दैवतापुढें कांहीं उपयोगी पडेना तेव्हां त्यानें आपल्याच मानेवर खड्ग धरून त्या दैवताला स्वतःचा बळि देण्याचें ठरविलें. तेव्हां त्या दैवतानें प्रसन्न होऊन अश्वत्थाम्याला शिबिरांत प्रवेश करूं दिला आणि तें गुप्त झालें. अश्वत्थाम्यानें त्या सर्व निद्रित वीरांना कापून काढलें. यांतील रणदैवत प्रसन्न करून घेण्याच्या कल्पनेचा उपयोग भीमाचा संताप वाढविण्यासाठीं केलेला आहे.

ही भीषण रात्र द्रोण सेनापति झाल्यानंतरची, परंतु अभिमन्यूच्या वधापूर्वीची अशी एक रात्र म्हणजे मार्गशीर्ष वद्य अष्टमीची रात्र असावी.

या अनुरोधानें त्या भीषण कृष्णरात्रीचें वर्णन ध्यानांत घ्यावे. घटोत्कच पुढें कर्णाच्या हातीं मरण पावला. भीमाचें आणि शक्तिकेतूचें संभाषण, त्यांतून अटळपणानें उद्‌भवलेलें उभयतांचें द्वंद्वयुद्ध, आधीं शस्त्रयुद्ध आणि नंतर मल्लयुद्ध या अनुरोधानें या प्रसंगाचा विचार करावा. मल्लयुद्धांत भीम अजिक्य होता. यानंतर त्या उभयतांचें संभाषण आणि त्या दंतपत्राचा उपयोग हें पहावें.

या काव्यांत सर्वांत महत्त्वाचें व्यक्तिमत्व श्रीकृष्णाचें. या काव्यांतील श्रीकृष्णाचें स्वभावचित्र सर्वथैव भिन्न परंतु माझ्या मतें योग्य आहे. महाभारतांत अनेक ठिकाणीं श्रीकृष्णाच्या स्वभावांत कुटिलता दाखविली आहे 'अनंत कोटि ब्रह्मांडनायकाची लीला अगम्य आणि अतर्क्य आहे.' या एका वाक्यानें त्याच्या कोणत्याहि कृतीचें चटकन् समर्थन करून मोकळें होता येतें. या काव्यांत श्रीकृष्णाचें व्यक्तिचित्र मी एका तीक्ष्णभावानें रेखाटलें आहे. '**कर्मयोग हा ! कर्मफलहि हें आतां प्राक्तन झालें...आरंभानें सदैव निश्चित अंतस्वरूप केलें**' ही कविता आणि, '**परमेश्वर जरि इथे जन्मला, असेंच जीवन त्याचें...हृदयविदारक घडेल अंतीं असेंच मरण तयाचें !**' ही या दोन कविता वाचकांनीं विशेष प्रकारें ध्यानांत घ्याव्या.

अखेर शक्तिकेतूला श्रद्धांजलि अर्पण केलेली आहे.

कोणत्याहि कलावंताला स्वतःच्या कलाकृतींतले विशिष्ट घटक महत्त्वाचे वाटतात. त्यांतून त्यानें आत्मप्रकटीकरण केलेलें असतें. या दृष्टीनें मी या काव्यांतील कांहीं स्थानांचा विभागशः उल्लेख केला. या काव्याचा उपयोग विद्यार्थ्यांनासुद्धां उत्तम प्रकारें होईल असें मला वाटतें. त्या दृष्टीनें थोडें विवेचन करतो.

आजच्या अध्ययनांत वाचनाला जें महत्त्वाचें स्थान मिळायला हवें तें मिळत नाहीं. अध्ययन म्हणजे हमाली नव्हे. अभ्यास ही सुद्धां एक कला आहे. तें केवळ ज्ञानाचा भार वाहणें नाहीं ही गोष्ट आतां विद्यार्थ्यांनींच जाणायला हवी. भाषाज्ञान हें संस्कृतिसंवर्धनाला आणि विचारग्रहणाला अत्यंत महत्त्वाचें आहे. यासाठीं विद्यार्थ्यांना वाचन हें अत्यावश्यक आहे. घरीं आणि शाळेंत दोन्ही ठिकाणीं विविध वाचनावर भर दिला पाहिजे.

शालेय ग्रंथालय अगदीं भरगच्च पाहिजे आणि त्यांतून विद्यार्थ्यांना वाचनीय अशीं भरपूर पुस्तकें विद्यार्थ्यांच्या हाताशीं ठेवलीं पाहिजेत. तीं वाचावीं म्हणून विद्यार्थ्यांना भरपूर उत्तेजन मिळालें पाहिजे. वाचन हें मनाचें बळ वाढविण्याचें एकमेव साधन आहे हें विद्यार्थ्यांनीं लक्षांत ठेवावें.

त्याचप्रमाणें वाचनांत विविधता हवी. सर्व प्रकारच्या विदग्ध वाङ्मय प्रकारांशीं शालेय जीवनांत विद्यार्थ्यांचा परिचय व्हावा. आज आपण याविषयीचें बरेंच विचारमंथन वर्तमानपत्रांतून वाचतो. सर्वांना असें वाटतें कीं विद्यार्थ्यांची भाषा सुधारावी, त्यांनीं विचारसंपन्न व्हावें. त्यांना उत्कृष्ट संस्कृतीचें वळण लागावें आणि विविध गुणांचा विकास त्यांच्या स्वभावधर्मांत व्हावा. त्यांनीं आपलें राष्ट्र आणि राष्ट्राची उन्नति यांचा विचार करायला समर्थ व्हावें. अशा प्रकारचें ध्येय आणि धोरण यांची घोषणा आपण सर्वदा व्यासपीठावरून आणि वर्तमानपत्रांतून वाचतो. पण प्रत्यक्षांत आपल्या समाजांत अजूनसुद्धां साहित्य, साहित्यिक आणि त्यांची संस्कृतिसाधना यांना जें महत्त्वाचें स्थान दिलें गेलें पाहिजे तें दिलें जात नाहीं. आपल्या सामाजिक जीवनांतील ही फार मोठी उणीव आहे आणि ती दूर झाल्याविना समाज विचार आणि आचार यांनीं संपन्न आणि विशाल होऊंच शकणार नाहीं. या दृष्टीनें आपण यापुढें प्रत्यक्ष प्रयत्न करणें अत्यावश्य आहे. माझ्या या काव्याचा या कार्यांत अल्पस्वल्प उपयोग झाला तरी तें मला भूषण आहे. अनुज्ञा असावी.

इत्यलम्

REFBK-0012739
REFBK-0012739
...राठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ............ दि: ...२००५...
...
९२८३९